दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २५८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१८ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# महापुरुषांबद्दल गलिच्छ शब्द वापरणाऱ्यांना धडा शिकवावाच लागेल : शरद पवार

## महाविकास आघाडीच्या महामोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**महापुरुषांबद्दल गलिच्छ शब्द वापरणाऱ्यांना धडा शिकवावाच लागेल, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महाविकास आघाडीच्या महामोर्चात विरोधकांचा समाचार घेतला. महापुरुषांविषयी करण्यात आ-लेली वादग्रस्त वक्तव्य, कर्नाटक सीमाप्रश्न आणि राज्यातील बाहेर चाललेले उद्योग याचा निषेध करण्यासाठी आज मुंबईत मोर्चा काढण्यात आला होता.**



महामोर्चात बोलताना शरद पवार म्हणाले, आज आपण महाराष्ट्राच्या सन्मानासाठी एकत्र आलो आहोत. छत्रपतींचे नाव लोकांच्या मनावर अखंड आहे. छत्रपतींचा अपमान महाराष्ट्र कदापी सहन करणार नाही. देशात कोणत्याही राज्यात केलो तरी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांचे नाव आदराने घेतले जाते. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांना लवकरात लवकर हाकला. महाराजांचा अपमान करणाऱ्यांना राज्यातून हाकला त्यांची हकालपट्टी करा, अशी मागणी पवारांनी केली. राज्यात असलेल्या सरकारमध्ये महाराष्ट्राची बदनामी करण्याची स्पर्धा सुरू असल्याची टीका सुरू असल्याचे ते म्हणाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर आजपर्यंत मुंबईत लाखोंच्या संख्येने मोर्चे निघाले होते. पण आजचा मोर्चा हा वेगळ्या स्थितीचे दर्शन घडवत आहे. तेव्हा मराठी भाषिकांचे राज्य यावे यासाठी लढा दिला होता. मात्र आज ही मराठी भाषिकांवर अन्याय केला जातोय. ज्यांच्याकडून राज्याची सूत्रे आहेत त्यांच्याकडून एक वेगळ्या प्रकारची भाषा वापरली जाते आहे. या देशात अनेक राजे होऊन गेले. पण ३५० वर्ष झाले तरी सामान्य लोकांच्या मनावर छत्रपतींचे नाव अखंड आहे. छत्रपतींचा अपमान राज्यातील एखादा मंत्री करतो अन्य कोणी तरी करते हे महाराष्ट्र कदापी सहन करणार नाही.

या मोर्चाच्या माध्यमातून आज जो इशारा सरकारला देण्यात आला आहे त्याची दखल घेतली गेली नाही तर लोकशाहीच्या माध्यमातून राज्यातील जनता त्यांना थडा शिकवेल असा विश्वास पवारांनी यावेळी व्यक्त केला. फुले, शाहू, आंबेडकर आणि कर्मवीर ही आदराची स्थाने आहेत. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल अशी वक्तव्य करणाऱ्यांबद्दल शरम वाटली पाहिजे. ज्यांनी शिक्षणासाठी मोठे काम केले. त्यांची टिंगळ टवाळकी केली जाते असेल तर राज्यकर्ते म्हणून त्यांना तेथे राहण्याचा अधिकार नाही.

या मोर्चाच्या माध्यमातून केंद्र सरकारला लोकशाही मार्गाने इशारा देण्यात येत आहे की अशी वक्तव्य करणाऱ्यांची लवकरात लवकर हकालपट्टी करा. आज लोक शांत आहेत, पण ही कारवाई सुरू केली नाही तर जनता पेटून उठल्याशिवाय राहणार नाही, असे पवार म्हणाले. सरकारमध्ये एक स्पर्धा सुरू झाली आहे. ही स्पर्धा कशाची तर कौतुकाची किंवा विकासाची नाही तर राज्याच्या बदनामी करण्याची आहे. एका मंत्र्याने असा उल्लेख केला की फुले, आंबेडकर आणि कर्मवीर यांनी शिक्षण संस्था सुरु करण्यासाठी लोकांकडून भीक मागितली. या लोकांनी राज्यात ज्या ठिकाणी शिक्षणाची सोय नव्हती तेथे संस्था सुरू केल्या. अशा लोकांबद्दल गलिच्छ शब्द वापरले जात असेल तर त्यांना धडा शिकवण्याचे काम तुम्हाला करावे लागले.

## महाराष्ट्रद्रोह्यांच्या छाताडावर चालणार : उद्धव ठाकरे

महाविकास आघाडीकडून मुंबईत आयोजित करण्यात मोर्चाच्या सांगता सभेत बोलताना शिव-सेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजप नेत्यांचा जोरदार समाचार घेतला आहे. 'बऱ्याच वर्षांनंतर एवढा मोठा मोर्चा महाराष्ट्राने आणि देशाने पाहिला असेल. ज्यावेळी या मोर्चाची घोषणा केली तेव्हा काही जणांनी तुम्ही या मोर्चात चालणार का, असं मला विचारलं. मी तेव्हाच सांगितलं होतं की, केवळ मोर्चात चालणार नाही तर मी आणि लाखो महाराष्ट्रप्रेमी हे महाराष्ट्रद्रोह्यांच्या छाताडावर चालणार आहोत. हे चालणं प्रतिकात्मक आहे. आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी आपल्याला डिवचलं, त्यांच्या छाताडावर चालण्याची हीच ती वेळ आहे,' असं म्हणत उद्धव यांनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडलं.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर पुन्हा एकदा खरमरीत शब्दांत हल्ला चढवला आहे. 'आज सर्व पक्ष एकवटले आहेत, फक्त महाराष्ट्रद्रोही वेगळे आहेत. राज्यपाल हटवा, ही आमची मागणी आहे. खरंतर भगतसिंह कोश्यारी यांना मी आता राज्यपाल मानतच नाही. त्या खुर्चीचा मी सन्मान करतो. मात्र तिथे कोणीही बसावं आणि कोणालाही टपल्या माराव्यात, हे सहन केलं जाणार नाही. केंद्रामध्ये बसणाऱ्यांच्या घरी काम करणाऱ्या माणसाला कुठेतरी पाठवून द्यायचं, हे चालणार नाही. राज्यपाल हे राष्ट्रपतींचे दूत असतात. मात्र ते छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल, महात्मा फुलेंबद्दल, सावित्री फुलेंबद्दल अवमानकारक बोलत आहेत,' अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

## बेताल वक्तव्य करणारे पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टोचा पनवेलमध्ये तीव्र निषेध

### पाकिस्तानने जाहीर माफी मागायलाच हवी : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भिकेचे डोहाळे लागलेल्या पाकिस्तान कधीच सुधारायचे नाही त्यामुळे ते अश्या प्रकारची बेताल वक्तव्य करत आहेत. अश्या बेशरम लोकांची तोंड बंद करण्यासाठीच हे आंदोलन केले असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी निषेध आंदोलनावेळी केले. बेताल वक्तव्य करणाऱ्या पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो यांचा आज ( दि. १७) पनवेल भाजपच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या निषेध आंदोलनात भाजपचे पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर चारुश-ीला घरत, शहर सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला परत, राजश्री वावेकर, निता माळी, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, शहर खजिनदार संजय जैन, सरचिटणीस अमरीश मोकल, दक्षिण भारतीय सेलचे संयोजक माधुरी (श्रीनिवास) कोडरू, सांस्कृतीक सेलचे अभिषेक पटवर्धन, उत्तर भारतीय सेल जिल्हा संयोजक जितेंद्र तिवारी, सुहासिनी केकाणे, आरती तायडे, अंजली इनामदार, स्नेहल खरे, डॉक्टर पूनम पाटील, ज्योती देशमाने, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, युवानेते केदार भगत, विजय म्हात्रे, सतीश पाटील, देवांशू प्रभाळे, गणेश शेटे, अक्षय सिंग, कमलाकर घरत पल्लवी पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकते मोठया संख्येने सहभागी झाले होते.

पाकिस्तान हा देश अमेरिकेत झालेल्या '९/११' हल्ल्याचा मास्टरमाईंड ओसामा बिन लादेनला आश्रय देणारा देश असल्याचे वस्तुनिष्ठ विधान परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी केले होते. हे विधान पाकिस्तानाच्या जिव्हारी लागले असून, त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले. त्या निषेधार्थ पनवेल भाजपच्या वतीने आंदोलन करून पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टोचा निषेध करण्यात आला. यावेळी बिलावल भुट्टो आणि पाकिस्तानच्या विरोधात घोषणाबाजी करत विलावल भुट्टो यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले.

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत काश्मीरचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या पाकिस्तानला जयशंकर यांनी फटकारले होते. भारताकडून करण्यात आलेल्या विधानाला उत्तर देताना पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वैयक्तिक टीका केली होती. त्यामुळे भाजपच्या वतीने शनिवारी पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांचा निषेध करण्यात आला. दहशतवादाचा बिमोड करण्याचा मुद्दा हा सर्वच जागतिक व्यासपीठांवर ऐरणीवर आहे. दहशतवाद आणि दहशतवादी संघटनांना प्रायोजित करणे, त्यांना आश्रय देऊन वित्तपुरवठा करणे यामध्ये पाकचा सहभाग असल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पाकच्या परराष्ट्र मंत्र्यांचे असभ्य वक्तव्य हे पाकच्या अपयशाचे द्योतक आहे. न्यूयॉर्क, मुंबई, पुलवामा, पठाणकोट आणि लंडन ही शहरे पाकिस्तान प्रायोजित, समर्थित आणि भडकावलेल्या दहशतवादाचे बळी ठरले आहेत. त्यामुळे जगभरात निर्यात होणारा 'मेक इन पाकिस्तान' दहशतवाद थांबवावाच लागेल. अशी प्रतिक्रिया यावेळी निषेध व्यक्त करताना उमटली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, जगाला एकत्र आणण्याचे तसेच अर्थव्यवस्था वाढवण्याचे काम देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहे. पण विसावल भुट्टो झरदारी यांच्या सारखे लोक त्यांची प्रतिमा मलीन करण्याचे काम करत आहेत मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी याचे बेदाग वक्तीमत्व आहे, असे सांगत परराष्ट्रमंत्र्यांच्या या बेताल विधानाबद्दल पाकिस्तानने जाहीर माफी मागायलाच हवी अशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

## करंजाडे ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार : काशिनाथ पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल तालुक्यातील विरोधी पक्षाने प्रतिष्ठीत केलेल्या करंजाडे ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार, असे ग्रामपंचायत निवडणुकीच्या पूर्वसंध्येला दिलेल्या मुलाखतीत शेकापक्षाचे विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी दै.रायगड नगरीजवळ बोलताना आपले मत व्यक्त केले.**



शेतकरी कामगार पक्षाने पनवेल तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी गेले ५० वर्ष तन-मन-धन लावून काम केले असून तालुक्याचा विकास हा करण्यासाठी शेकापक्ष आजही कटीबद्ध आहे. कुणीही कितीही वल्गना केल्या तरी शेकापक्षाची ताकद आजही या तालुक्यात कायम असल्याचे शिक्कामोर्तब पनवेल को.ऑपरेटीव्ह अर्बन बँकेच्या झालेल्या निवडणुकीत विरोधकांना भुईसपाट करून शेकापक्षाने दाखवून दिलेली आहे.

शेकाप पक्ष आहे हा सामान्यांचा, गरीबांचा आणि शेतकऱ्यांचा पक्ष असल्यामुळे आजही पनवेल तालुक्यात ग्रामीण भागात शेकाप पक्षाची पाळेमुळे घट्ट रोवलेली आहेत.

गेले ५ वर्षे करंजाडे ग्रामपंचायतीवर शेकापक्षाची सत्ता असून रामेश्वर आंग्रे यांना शेकापक्षाने सरपंच करून या विभागाचा कायापालट करण्यासाठी शेकापक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी कश्याप्रकारचे नियोजन करावे याबाबत अनेक वेळा सल्ला दिला आणि सल्ल्याप्रमाणेच आंग्रे यांनी उत्कृष्ट काम केल्यामुळे करंजाडे ग्रामपंचायतीवर पुन्हा महाविकास आघाडीची सत्ता येणार यात तिळमात्र शंका नसल्याचे मत शेकापक्षाचे विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी दै.रायगड नगरीजवळ बोलताना आपले मत व्यक्त केले.

## शिंदे गट आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रचाराच्या दिवशी दोन गटात तुंबळ हाणामारी झाली असून या हाणामारीत एकमेकांची डोकी फोडण्यात आल्याचे दिसून येत आहे. दहिवली तर्फे वरेडी या ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने सायंकाळी ५ वाजता प्रचार संपल्यानंतर रात्री ११ वाजता शिंदे शिवसेना आणि महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये ही हाणामारी झाल्याने घटनास्थळी पोलीस हजर झाली होती.

कर्जत तालुक्यातील सात ग्रामपंचायतीसाठी उद्या १८ डिसेंबर रोजी निवडणुकीसाठी मतदार होणार आहे. तालुक्यातील महत्वाची समजली जाणारी नेरळ येथील दहिवली तर्फे वरेडी ग्रामपंचायत निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत होत असलेली चुरस पाहता रिंगणात शिंदे शिवसेना गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांचे निकट वर्तीय असलेले तसेच पंचायत समितीचे माजी सभापती राहिलेले अमर मिसाळ यांची पत्नी मेघा मिसाळ ही निवडणूक लढवत असून एकीकडे विरोधात महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून तर येथील माजी सरपंच चिंदू तरे यांची नातलग म्हणून नेत्रा तरे ही उच्च शिक्षित महिला ही निवडणुकीच्या रिंगणात असल्याने या निवडणुकीला मोठे महत्व प्राप्त झाल्याने तालुक्याचे लक्ष या ग्रामपंचायतिकडे लागून राहिले आहे.

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा प्रचाराचा काल शुक्रवार १६ डिसेंबर रोजी शेवटचा प्रचार दिवस संपल्याने राजकीय पुढाऱ्यांनी आता मतदारांना गुपचूप रात्री गाठण्याचा प्रयत्न सुरू केल्याने या दरम्यान रात्री ११ वाजण्याच्या सुमारास शिंदे शिवसेना गटातील कार्यकर्ते आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते समोरा समोर आल्याने सुरुवातीला किरकोळ वादावरून नंतर त्याचे रूपांतर हाणामारीत झाले आहे. यामध्ये परस्पर कार्यकर्त्यांनी एकमेकांची डोकी फोडली आहेत, तर मारहाण करताना फावडा-टिकावच्या दांडक्यांचा तर लोखंडी रॉडचा वापर केला असल्याचे जखमी कार्यकर्ते सांगत आहेत.

महाविकास आघाडीचे थेट सरपंच पदाचे उमेदवार असलेले नेत्रा तरे यांचे पती निलेश तरे यांच्या डोक्यात विरोधी पक्षाचे थेट सरपंच पदाचे उमेदवाराचे पती माजी सभापती अमर मिसाळ यांनी आपल्यावर जीवघेणा हल्ला केला त्यात माझ्या डोक्यावर जबर मार लागला असून मी मूर्च्छित पडलो असल्याचा आरोप केला तर सोबत चार ते पाच जणांना मिसाळ यांच्या सोबत आलेल्या तरुणांनी मारहाण केली असल्याचे देखील सांगितले.

तर एकीकडे आता शिंदे गटातील कार्यकर्त्यांना येथील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी प्रथम मारहाण करण्यास सुरुवात केली असल्याचा आरोप जखमी अमर मिसाळ यांचे भाऊ विकी मिसाळ यांनी यावेळी केला तर महिलांना शिवीगाळ देखील केली असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. एकूणच दोन गटात झालेल्या या हाणामारीमुळे नेरळ पोलीस ठाण्यात एकमेकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आल्याने गा-वात देखील तणावाचे वातावरण पासरले असून येथे मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने गावाला आता छावणीचे रूप आलेले दिसून येत आहे.



# विलंबित शहाणपण

श्रद्धा वालकर या तरुणीच्या नृशंस हत्येनंतर समाजमन ढवळून निघाले. दोन सज्ञान व्यक्तींनी केलेल्या आंतरधर्मीय विवाहाची परिणती इतकी भयानक व्हावी, हा केवळ धक्का नव्हता; तर सामाजिक सलोख्यावरचा तो ओरखडा होता. यातील संशयित आरोपीच्या धर्मामुळे या हत्येला वेगळे परिमाण मिळाले. याचा ज्यांना राजकीय लाभ घ्यायचा असतो, ते लगेच सक्रियही झाले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने आंतरधर्मीय विवाह समन्वय समिती नेमण्याचा घेतलेला निर्णय समजावून घेण्यासारखा आहे. श्रद्धाच्या विवाहाबाबत दोन्ही कुटुंबे आणि दोघांचे पालक यांच्यात कितपत संवाद होता आणि त्या विसंवादाचा परिणाम दोघांच्या नात्यावर झाला का, या प्रश्नांची उत्तरे यथावकाश मिळतील. मात्र, राज्याच्या महिला आणि बालकल्याण खात्याने या समितीची घोषणा करताना त्यात 'आंतरजातीय' हा शब्द टाकावा, हे खरोखर आश्चर्यकारक होते. असे महत्त्वपूर्ण आदेश निर्गमित होताना उच्चस्तरीय पातळीवर त्यांचा सांगोपांग विचार होतो की नाही, असा प्रश्न पडतो. आता टीकेचे मोहोळ उठल्यानंतर दोन पावले मागे जात व विलंबित शहाणपण दाखवत या आदेशातील 'आंतरजातीय' हा शब्द गेला आहे. ही समिती केवळ 'आंतरधर्मीय' विवाहांमधील विसंवाद दूर करण्यासाठी काम करेल. महाराष्ट्र हा सामाजिक सुधारणांमध्ये सदैव अग्रणी राहिला आहे. जातिअंताची लढाई जिंकायची तर आंतरजातीय विवाह मोठ्या प्रमाणात व सातत्याने होत राहणे, हा त्यावरचा महत्त्वाचा मार्ग आहे. दिवंगत रिपब्लिकन नेते रा. सू. गवई हे आंतरजातीय विवाहांबाबत एक मुद्दा आग्रहाने मांडत. ते म्हणत की, 'समाजातील आंतरजातीय प्रेमविवाहांमुळे समाज फार पुढे गेला आहे, हे मी मानत नाही. जेव्हा वेगवेगळ्या समाजातील पालक एकत्र येऊन आपल्या मुलामुलींचे विवाह आनंदाने लावून देतील, तेव्हा सुधारणांचे पाऊल पुढे पडेल. प्रेमविवाहात इलाजच नसतो, म्हणून पालक तो स्वीकारतात.' गेल्या काही वर्षांत गवई यांची अपेक्षा अल्प प्रमाणात प्रत्यक्षात येते आहे. मात्र, तरीही आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांत प्रेमविवाह सर्वाधिक असतात. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार अनेक योजना चालविते आणि अशा जोडप्यांना या खात्याकडून ५० हजार रुपयांचे अर्थसाह्य दिले जाते. या दोघांमधील एक अनुसूचित जाती-जमातींमधील, दलित समाजातील असेल तर ही अनुदानाची रक्कम तीन लाखांपर्यंतही जाऊ शकते. एकीकडे, राज्य सरकार असे प्रोत्साहन देत असताना दुसरीकडे आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना एकाच मोजमापाने मोजून त्यांच्यातील समन्वयासाठी एकच समिती नेमणे, ही घोडचूकच झाली होती. सुदैवाने, ही चूक सरकारने लवकर दुरुस्त केली असून ही समिती आता गरज पडेल तेव्हा आंतरधर्मीय विवाहांमध्ये समन्वय साधेल. तसे म्हटले तर कोणत्याही विवाहात स्त्रीवर अन्याय होत असेल, अत्याचार होत असतील किंवा मानसिक छळ होन असेल तर सर्व प्रकारची मदत आणि आश्रय तातडीने मिळायला हवा. त्यात जात, धर्म, प्रांत, भाषा हे सारेच मुद्दे गैरलागू आहेत. आंतरधर्मीय विवाहांत एक मुद्दा येतो तो सहचराच्या धर्मांतराचा. हिंदू मुलगी आणि मुस्लिम मुलगा असे विवाह झाले तर नवविवाहितेवर धर्म बदलण्याची सक्ती होताच कामा नये. तिला तिचा धर्म मोकळेपणो पाळता आला पाहिजे. हेच स्वातंत्र्य नवविवाहित मुलाबाबतही आवश्यक आहे. मात्र, भारतीय समाजात फारच थोडे 'प्रेमविवाह' काचणारी सामाजिक, सांस्कृतिक किंवा कौटुंबिक बंधने ओलांडू शकतात. त्यामुळेच, लग्नानंतर अनेकदा मुलींवर धर्मांतराची सक्ती होते. श्रद्धाचा जो छळ आणि नंतर निर्दयी हत्या झाली; ते तर क्रौर्याचे भयंकर उदाहरण आहे. आफताब या तिच्या नवऱ्यावरील सारे आरोप सिद्ध झाले तर त्याला फाशी व्हावी, असेच कोणत्याही न्यायप्रेमी नागरिकाला वाटेल. मात्र, भविष्यात अशी वेळच येऊ नये, यासाठी नव्याने सुरू होणारी 'हेल्पलाइन' काम करील, अशी अपेक्षा आहे. गेल्या काही वर्षांत 'लव्ह जिहाद' अशी संज्ञा जन्माला आली असून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्याशी विवाह करणे, असा त्या संज्ञेचा अर्थ आहे. प्रत्येक आंतरधर्मीय प्रेमविवाहाकडे असे पाहणे, योग्य नाही. मात्र, उत्तर प्रदेशाने आंतरधर्मीय विवाहानंतर केलेले धर्मांतर हे कायद्याने दंडनीय ठरविले आहे. मध्य प्रदेश आणि हरयाणा ही राज्येही याच वाटेवर जात आहेत. खरे तर, आंतरधर्मीय प्रेमविवाहांत धर्मांतराचा काही मुद्दाच येता कामा नये. मात्र, तसे वास्तवात होत नाही. या साऱ्या प्रश्नाला जातीय किंवा धार्मिक रंग न देता अडचणीत किंवा संकटात सापडलेल्या कोणत्याही विवाहित मुलीला विश्वासाने सरकारी यंत्रणेकडे किंवा सामाजिक संस्थांकडे धाव घ्यावीशी वाटली पाहिजे. श्रद्धाबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक संस्था आणि सारा समाजच अपयशी ठरला. असे संभाव्य अपयश टाळणे, हे नव्या समित्या, यंत्रणांचे उद्दिष्ट हवे. राजकारण करणे, हे नव्हे.

# उरण उपजिल्हा रुग्णालय आणि मोरा सागरी पोलीस ठाणे इमारतीच्या बांधकामास निधी देणार : ना.रवींद्र चव्हाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला उरण उपजिल्हा रुग्णालय आणि मोरा सागरी पोलीस ठाणे इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिले असून उरणचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून हा प्रश्न निकाली लागला आहे.



या संदर्भात नामदार रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठपुरावा करत त्यांच्यासोबत सिडको व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आमदार महेश बालदी यांच्या विनंतीवरून नुकताच खांदा कॉलनी येथे पार पडली. या बैठीकीस भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सुषमा गायकवाड, कार्यकारी अभियंता रुपाली पाटील, उप विभागीय अधिकारी नरेश पवार, मिलिंद कदम, नवी मुंबई सहाय्यक पोलीस आयुक्त मिलिंद वाघमारे, सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग धनाजी क्षिरसागर, मोरा पोलीस ठाणे वरिष्ठ निरीक्षक अभिजित मोहिते, उरण ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक डॉ. बी. एम. काळेल, शल्य चिकित्सक डॉ. रोकडे, तालुका वैद्यकीय अधिकारी राजेंद्र इटकरी, नितीन वरकुटे आदी अधिकारी उपस्थित होते.

उरण येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाची उभारणी करण्यासाठी २०१८ साली फडणवीस सरकारच्या कार्यकाळात प्रशासकीय मान्यता मिळाली होती. आणि सदरचे काम सीआरएस फ़ंडातून करण्यात होणार येणार होते. मात्र महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सन २०२२ पर्यंत या कामाला मुहूर्त लागला नाही. त्याचबरोबर मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम हे अंशदान योजतंर्गत मंजूर असल्याने या कामास वाढीव निधीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने या दोन्ही विषयासंदर्भात आमदार महेश बालदी यांनी पाठपुरावा कायम ठेवला. शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर या कामाला गती मिळणार असल्याने आमदार महेश बालदी यांनी नामदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली होती. या बैठकीत नामदार रवींद्र चव्हाण यांनी सिडको आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तांत्रिक अडचणी दूर करण्यास सांगून काम तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश दिले आणि या इमारतींच्या कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे आश्वासित केले.

# सोन्याच्या दागिन्यांची सापडलेली पिशवी परत केली

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आजच्या युगात प्रामाणिकपणा शिल्लक राहिला नाही असे आपण नेहमीच ऐकत आलो आहे मात्र आज कर्जत मधील युवकाने हे वाक्य मोडीत काढून सोन्याच्या दागिन्यांची सापडलेली पिशवी परत केली आहे आणि अजूनही प्रामाणिकपणा शिल्लक आहे हे त्याने कृतीमधून दाखवुन दिले आहे.

कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील गुंडगे परिसरात राहणारे श्री सोमजाई ग्रामस्थ मंडळाचे उपाध्यक्ष निलेश म्हामूणकर ह्यांना गुंडगे रेशनिंग दुकान जवळ एक पिशवी सापडली त्यामध्ये सोन्याच्या दागिने होते, पिशवीत अंदाजे ४ ते ५ तोळा सोने होते सुमारे २५०००० रक्कमेचे ते सोने कर्जत तालुक्यातील आवळस येथे राहणारे ज्ञानेश्वर सुर्वे ह्यांच्या पत्नीचे होते, दागिन्यांची ओळख पटवून ती दागिन्यांची पिशवी त्याच्या हाती स्वाधीन करण्यात आली.

निलेश म्हामूणकर यांचा प्रामाणिकपणा पाहून स्थानिक नगरसेवक उमेशअप्पा गायकवाड यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवून सत्कार केला,याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक सीताराम कांगणे, किशोर चाळखे, रोहित विश्वासे, बाबू विश्वासे व इतर ग्रामस्थ उपस्थित.



# राज्यातील नपा व मनपा शिक्षकांचे १६ जानेवारीला धरणे आंदोलन : अर्जुन कोळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासन केवळ जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील शिक्षकांसाठी शासन आदेश काढते. मात्र आपले नगरपरिषद व महानगरपालिका शिक्षकांवर सातत्याने अन्याय करीत आहेत. नगरपरिषद व महानगरपालिका शिक्षकांना १००% वेतनवाढ व पदोन्नतीत योग्य न्याय न मिळाल्यास राज्यातील १० हजार शिक्षक नगरविकास विभागाच्या पर्यायाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात मुंबईत आझाद मैदानावर धरणे आंदोलन करणार असल्याची घोषणा राज्य नपा व मनपा शिक्षक संघाचे अध्यक्ष अर्जुन कोळी यांनी केली.

सासवड येथे आयोजित महामंडळ सभेत ते बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष संजय आवळे, कार्याध्यक्ष सुभाषराव कोल्हे, सरचिटणीस अरुण पवार, महिला आघाडी प्रमुख साधनाताई साळुंखे, ट्रस्ट सचिव शिवाजीराव राजिवडे, ट्रस्ट उपाध्यक्षा ज्योत्स्ना भरडा, कोकण विभागीय अध्यक्ष वैभव पाटील यांच्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राज्य अध्यक्ष कोळी म्हणाले, ग्रामविकास विभाग जिल्हा परिषद व खाजगी शाळेतील शिक्षकांसाठी शासन आदेश काढते. मात्र नगरविकास विभागास नपा व मनपा शिक्षकांचा विसर पडला आहे. सर्व धोरणात्मक निर्णय जिल्हा परिषद शिक्षकांसाठी घेतले जातात. मात्र नपा व मनपा शिक्षकांना वगळले जाते. त्यांना १००% वेतना साठी संघर्ष करावा लागतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नगरविकास मंत्री असल्या पासून सातत्याने मागणी करुनही त्यांनी पदोन्नती,ऑनलाईन बदली पोर्टल, या सारखे गंभीर प्रश्नाकडे कधीच लक्ष दिले नाही. राज्यातील नपा व मनपा शिक्षकांना १००% वेतनासाठी सतत संघर्ष करावा लागतो.ही खेदाची बाब आहे. त्यामुळे नगरविकास विभागास जाग आणण्यासाठी एक महिन्याचा कालावधि देण्यात येत असून, आमचे प्रश्न न सोडविल्यास १६ जानेवारीला १० हजार शिक्षक आझाद मैदानावर धरणे आंदोलन करतील. यावरही शासनाने दखल न घेतल्यास नाइलाज म्हणून आत्मदहन करावे लागेल असा इशारा कोळी यांनी नगरविकास विभागास दिला आहे.



# राजकारण्यांचे कधी होणार मनोमिलन ; एकही थेट सरपंच निवड बिनविरोध नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यात दहा ग्रामपंचायतींसाठी १८ डिसेंबर रोजी निवडणुका पार पडत आहेत. २० डिसेंबर रोजी मतमोजणी असून यावेळी कोणत्या पक्षाची सत्ता येणार हे कळणार आहे. ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये मतदार संख्या कमी असल्याने प्रत्येक मत अत्यंत महत्त्वाचे असते.

त्यामुळे गावातील समाज जीवन पूर्णपणे ढवळून निघतो. एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले जातात. गाव हा पक्षांमध्ये, जातीमध्ये विभागला जाऊन भावकी आणि समाजामध्ये दुफळी निर्माण होते. पनवेलमधील एकाही ग्रामपंचायतमध्ये सरपंचाची बिनविरोध निवड झालेली नाही.

सरपंच पदासाठी २४ उमेदवार

पनवेलमधील १० ग्रामपंचायतच्या सरपंच पदासाठी २४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. सरपंच पदासाठी ४५ जणांनी उमेदवारी अर्ज भरले होते. सात डिसेंबर रोजी सरपंच पदासाठी ४५ पैकी २१ जणांनी माघार घेतली.

सरपंच पदाच्या उमेदवारांची ग्रामपंचायतनिहाय संख्या

भाताण २, शिरढोण २, शिवकर २, चिंध्रण २, दिघाटी २, करंजाडे २, कानपोली ३, केळवणे ४, नेरे ३, नितळस २

१० ग्रामपंचायतसाठी होणार निवडणूक

भाताण, शिरढोण, शिवकर, चिंध्रण, दिघाटी, करंजाडे, कानपोली, केळवणे, नेरे, नितळस या १० ग्रामपंचायतसाठी निवडणूक होत असून प्रचाराला वेग आला आहे.

किती जागांसाठी किती उमेदवार?

दहा ग्रामपंचायतमध्ये ९४ जागांच्या सदस्य पदामधून १२ सदस्य बिनविरोध निवडून आल्याने ८२ सदस्यांसाठी मतदान होणार आहे. सरपंच पदासाठी एकूण ४५ सदस्यांनी अर्ज दाखल केले होते. सात डिसेंबर रोजी २१ जणांनी अर्ज मागे घेतले तर सदस्य पदासाठी एकूण २५८ अर्ज आले होते. तर ७ डिसेंबर रोजी ७५ सदस्यांनी अर्ज मागे घेतले. तर १८३ सदस्य निवडणूक लढवणार आहेत.

या ग्रामपंचायतींकडे जिल्ह्याचे लक्ष

शिवकर : २०१७ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत शिवकर येथील सरपंचपदाचे भाजपचे उमेदवार अनंत ढवळे व शेकापचे अनिल ढवळे या दोघांनाही ८४९ मते मिळाली. यावेळी चिठ्ठी काढण्यात आली व त्यात शेकापचे अनिल ढवळे याना विजयी घोषित करण्यात आले. हे प्रतिस्पर्धी पुन्हा एकमेकासमोर उभे ठाकले आहेत. यातून कोण विजयी होते हे २० डिसेंबर रोजी समजेल.

चिंध्रण : चिंध्रण ग्रामपंचायत मध्ये भाजपचेच दोन्ही सरपंचपदाचे उमेदवार गाव पातळीवर स्थानिक आघाडी/युती करत एकमेकाविरोधात निवडणूक लढवत आहेत. या ग्रामपंचायत मध्ये शेकापने त्याना साथ दिली आहे. त्यामुळे कोणीही हरले किंवा जिंकले तरी भाजपचाच सरपंच होणार आहे.

नेरे : नेरे ग्रामपंचायतमध्ये शेकाप कडून शंकर गोपाळ ठाकूर, भाजपकडून प्रकाश गोपाळ घाडगे आणि अपक्ष म्हणून कांतीलाल सदाशिव खुटले निवडणूक लढवत आहेत. गत निवडणुकीत मनसेने शेकापला साथ दिली होती. तर या निवडणुकीत मनसेने भाजपला साथ दिली आहे. तर अपक्ष म्हणून लढत असलेले कांतीलाल खुटले यांचा देखील जनसंपर्क चांगला असल्याने त्यांना किती मते मिळतात आणि त्यामुळे कोणाचा फायदा व नुकसान होतो हे २० डिसेंबरला समजेल.

# वानस्ते मालुक पन्हेली(ता.तळा) ते म्हसळा तालुका सीमेपर्यंत रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील तळा व म्हसळा या दोन तालुक्यांना जोडणारा रस्ता खूप वर्षांपासून अतिशय दुरावस्थेत होता. सदरील वानस्ते मालुक पन्हेली ते म्हसळा तालुका बॉण्ड्री रस्त्याची प्रस्तावित लांबी ५.०० किमी आहे. सदर रस्त्याला प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूरी मिळाली आहे.

अनेक वर्ष खड्डेमय समस्या पासून या पंचक्रोशीतील नागरिक प्रवास करीत होते तो काळ लवकरच संपणार आहे व अतिशय सुंदर व मजबूत रस्ता या योजनेतून बांधण्यात येणार आहे.

सदरील रस्ता शासनाच्या माध्यमातून मंजूर करण्याकरिता मा सदस्य महाराष्ट्र प्रदेश कृष्णा कोबनाक सातत्याने प्रयत्न करीत होते,अखेर त्यांचे आभ्यासू मागणीला शिंदे- फडणवीस सरकारने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूरी दिली. कोबनाक यांचा सातत्याने पाठपुरावा आणि आभ्यासू मागणीला यश आले, तळा आणि म्हसळा या दोनही तालुक्यांतील या परिसरातील ग्रामस्थानी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य कृष्णा कोबनाक आणि भाजपाचे आभार मानले आहेत.




# उत्तम कार्य केल्याबद्दल यशवंत ठाकूर यांचा सन्मान



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील बोकडविरा गावातील सामाजिक कार्यकर्ते गणपती देवस्थानचे ट्रस्टी, रायगड भूषण सन्मानित, यशवंत हरिश्चंद्र ठाकूर यांची गेली दोन वर्षांपूर्वी उरण तालुका विधी सेवा समिती येथे विधी स्वयंसेवक म्हणून निवड झाली.

उत्तम प्रकारे काम केल्याबद्दल उरण न्यायालयाचे न्यायाधीश निलेश वाली व दूसरे सह दिवाणी न्यायाधीश प्रियांका पठाडे, उरण बार असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रेय नवाळे यांच्या उपस्थितीमध्ये यशवंत ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. उत्तम प्रकारे उरण तालुक्यातील लोक न्यायालयाच्या माध्यमांतून समंजसपणे वाद-विवाद मिटवण्याचा जाहिरातीद्वारे प्रचार-प्रसार ३६ ग्रामपंचायतीमध्ये प्रत्यक्ष जाऊन केल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अलिबाग यांचे वतीने सन्मानित करण्यात आले. व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. शेतकरी कामगार पक्षातर्फेहि त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयींमध्ये सकारात्मक बदलासाठी प्रयत्न करावा : ना.दिपक केसरकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई शहर जिल्ह्यात 'माझी मुंबई - स्वच्छ मुंबई' अभियान राबविले जात आहे. सर्व अंगणवाड्या, बालवाड्या, शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जनजागृतीद्वारे सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने अभियानाची अंमलबजावणी करावी, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी दिले.

मुंबईचा शाश्वत विकास करण्याचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून या अभियानामध्ये शाळांचा सक्रीय सहभाग असावा या उद्देशाने श्री.केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुंबई शहर जिल्हाधिकारी राजीव निवतकर, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.संजीवकुमार, पी.वेलारासू, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे, मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक संदीप संगवे, महानगरपालिकेच्या उपायुक्त चंदा जाधव, अभियानाचे मुख्य समन्वय अधिकारी डॉ. सुभाष दळवी तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील शाळांचे सुमारे १००० मुख्याध्यापक ऑनलाईन उपस्थित होते.



अभियान कालावधीत प्रत्येक आठवड्यातील शनिवार व रविवार स्वच्छता दिवस म्हणून घोषित करण्यात येतील. या दिवशी अभियान भागीदार त्यांच्याशी निगडीत अथवा त्यांनी निवडलेल्या क्षेत्रामध्ये स्वच्छता अभियान राबवतील. अभियान कालावधीत उर्वरित दिवशी स्वच्छता विषयक विविध कार्यक्रम हाती घेण्यात येतील. तसेच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीचे आयोजन व मिशन मोडमध्ये स्वच्छताविषयक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प राबविणे अशा कार्यक्रमांचा अंतर्भाव करण्यात येईल असे बैठकीत नियोजन करण्यात आले.

सर्व अंगणवाड्या, बालवाड्या, महानगरपालिकेच्या शाळा, मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित, विना अनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित प्राथमिक/ माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जनजागृतीद्वारे सार्वजनिक स्वच्छतेच्या सवयींमध्ये आमूलाग्र बदल घडवून अभियानाची अंमलबजावणी करतील. सदर अभियान यशस्वी होण्याकरीता आपल्या शाळांचा मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला जाईल तसेच महानगरपालिकांचे प्रभाग कार्यालय व शिक्षण विभागाची कार्यालये यांच्याकडून आवश्यक ते साहाय्य करण्यात येईल, असे उपस्थित अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दुकानातच चोरी करणाऱ्या नोकराला एनआरआय पोलिसांनी केली अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काम करत असलेल्या दूध डेअरीच्या गल्ल्यातून सुमारे अडीच लाख रुपये रोख रक्कम चोरून गावी पळून गेलेल्या आरोपीला एन आर आय पोलिसांनी गजाआड केले आहे. आरोपीकडून स्वतःच्या अकाउंट मध्ये जमा करण्यात आलेले ९५ हजार रुपये गोठवण्यात पोलिसांना यश आले आहे.

सदर घटनेतील आरोपी शिवम राजेश शुक्ला (वय २३, रा जोनपूर, उत्तर प्रदेश) ह्याने काम करीत असलेल्या दूध डेअरीच्या गल्ल्यातील सुमारे अडीच लाख रुपये रोख रक्कम घेऊन पसार झाला होता. त्याअनुषंगाने पोलिसांचे उत्तर प्रदेश येथे एक पथक रवाना झाले परंतु पथक उत्तर प्रदेश जोनपुर येथे पोहोचले असता आरोपी परत नालासोपारा ठाणे येथे आल्याचे समजले.

आरोपी हा वारंवार सिम कार्ड बदलून आपले राहण्याचे ठिकाणे बदलवत असल्याने पोलिसांच्या तपासात अडथळा निर्माण होत होता. अखेर तांत्रिक तपासद्वारे तो वज्रेश्वरी येथील एका डोंगराळ भागात लपून बसल्याचे समजताच त्याला तेथून अटक करण्यात आली.

पोलिसांनी त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून चोरी केलेली रकमेतील सोळा हजार रूपये किमतीचा विकत घेतलेला फोन व आरोपीचे स्वतःचे अकाउंट वर डिपॉजिट केलीली ९५ हजार रुपये रक्कम गोठविण्यात यश आले आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून या अगोदरही बऱ्याच ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या निवडणूक मतदानासाठी यंत्रणा सज्ज : आज मतदान

उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या निवडणूक मतदानासाठी यंत्रणा सज्ज : आज मतदान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील आज रविवार दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी होत असलेल्या १७ ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच व सदस्यांच्या मतदानासाठी पोलिस बंदोबस्तात ठिकठिकाणी रवाना करण्यात आले असल्याची माहिती उरणचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे. उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या मतदान प्रक्रियेसाठी ६१ मतदान केंद्र आहेत. या ६१ मतदान केंद्रावर मतदान शांततेत पार पाडण्यासाठी ३६६ कर्मचारी, अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

काल शनिवारी १७ डिसेंबर २०२२ रोजी उरण तालुक्यातील पाणजे, डोंगरी, नवीनशेवा, बोकडविरा, भेंडखळ, नवघर, पागोटे, जसखार, करळ, धुतुम, चिर्ले, रानसई, कळंबुसरे, पिरकोन, सारडे, वशेणी व पुनाडे आदी १७ ग्रामपंचायतीमध्ये मतदान यंत्रासह मतदान साहित्य पोलिस बंदोबस्तात पाठविण्यात आले असून, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर एका पोलिस कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली असून, उरण तालुक्यातील या १७ ग्रामपंचायतींच्या थेट सरपंच व सदस्यांच्या निवडणुकीसाठी शासकीय यंत्रणा सज्ज झाली असल्याची माहिती उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.

## जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत सर एस ए हायस्कूल मुरुडचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून झालेल्या जिल्हास्तरीय शालेय खो–खो स्पर्धेत जंजिरा विद्या मंडळ संचालित सर एस ए हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ट महाविद्यालय मुरुड जंजिरा यांनी आपले वर्चस्व दाखविले. सुधागड पाली तालुक्यातील नांदगाव हायस्कूल मध्ये जिल्हास्तरीय खो–खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सर. एस. ए. हायस्कूलच्या १९ वर्षीय वयोगर मुलांच्या स्पर्धेत तसेच १७ वर्षीय वयोगट मुलींच्या खो–खो सार्धेत दोन्ही संधानी रायगड जिल्हात दुसरा या खेळाडूंना क्रमांक मिळवून यश संपादन केले. या शाळेतील कीडा शिक्षक बालाजी घुणे, महेंद्र घाटवळ, प्राजक्ता आरेकर, निवृत्त कीडा शिक्षक पी. के. आरेकर यांनी खूप मेहनत घेवून यश संपादन केले. या दोन्ही संघातील खेळाडूंचे व कीडा शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, उपाध्यक्षा प्रतिभा जोशी, सचिव चंद्रकांत अपराध, संचालक प्रकाश विरकुड, प्रमोद भागदे, अभय दिवेकर, उदय दांडेकर मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे, शाळेचे सर्व शिक्षिका, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले. मुरुड शहर व तालुक्यातील सर्व नागरिकांनी विशेष कौतुक केले.

## प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत पिंगळस आश्रम शाळा चॅम्पियन

**दै.रायगड नगरी । रोहा**



आदिवासी विकास विभाग अंतर्गत प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धा रोहा तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा सानेगाव येथे पार पडल्या. या स्पर्धेत कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व मैदानी खेळ घेण्यात आले. या खेळामध्ये सर्वाधिक म्हणजे १७५ गुण मिळवत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा पिंगळस या शाळेने चॅम्पियन हा किताब मिळविला. तर १५० गुण मिळवत राणपाखर आश्रम शाळा द्वितीय आणि १३५ गुण मिळवत सानेगाव आश्रम शाळा तृतीय क्रमांक मिळविला. कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळात क्रीडा स्पर्धा झाल्या नव्हत्या मात्र त्याआगोदर प्रकल्प स्तर क्रीडा स्पर्धेत सानेगाव आश्रम शाळा सतत दोन वर्षे चॅम्पियन होती. या शाळेचा हॅट्रिक गेल्याने शाळेमध्ये हिरमोड झाल्याचे पाहायला मिळाले. यापुढे आम्ही चांगला खेळ करू असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

स्पर्धेचे उद्घाटन प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या हस्ते झाले. तर बक्षीस वितरण सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी शिक्षण सतीश शेरमकर, ज्योती वाघ मॅडम, ए. बी. हेमाडे, मुख्याध्यापक मधुकर फसाळे, संजय माघाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एम. पी. पाटील, अजित पवार, डी. पी. भुसे, गा–वीत सर, मुख्याध्यापक एस. एन. पिंगळे, उत्तम पाटील, निवाते सर, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, अधीक्षक, अधिक्षिका, शिक्षक, वर्ग चार कर्मचारी व खेळाडू विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सानेगाव आश्रम शाळेत घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये वय १४,१७ व १९ वर्ष वयोगटात मुली व मुले असे गट करण्यात आले होते. कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व मैदानी स्पर्धेतील धावणे, उडी मारणे आणि थ्रो करणे हे सगळे खेळ घेण्यात आले. या सर्व खेळांसाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला होता.

पेण प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेत २४ शाळा सहभागी झाल्या होत्या. रोहा येथील सानेगाव आश्रम शाळेत १५०० विद्यार्थी व २०० शिक्षक निवासी गेली तीन दिवस राहत या स्पर्धा मोठ्या दिमाखात पार पडल्या. शासकीय आश्रम शाळा सानेगाव च्या मुख्याध्यापक मधुकर फसाळे व सर्व शिक्षकांनी या स्पर्धेसाठी अहोरात्र मेहनत घेतली. सानेगाव आश्रम शाळेतील मुख्याध्यापक, अधीक्षक, शिक्षक व शिपाई यांनी राहण्याची, भोजनाची उत्तम सोय गेली चार दिवस केल्याने चिवे आश्रम शाळेचे मुख्याध्यापक एस. एन. पिंगले सर यांनी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर फसाळे यांचे आभार मानले तर बाकीच्या शाळांतील सर्व मुख्याध्यापक यांनी विषेश कौतुक केले.

## यु.ई.एस.स्कूल येथे मार्केटिंग डे व उद्योजक मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील यु.ई.एस. स्कूल, ज्युनिअर ण्ड सिनिअर कॉलेजमध्ये 'मार्केटिंग डे' व 'उद्योजक मेळावा' मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञानंही मिळावं या दृष्टीने यु.ई.एस. व्यवस्थापनाने 'मार्केटिंग डे' तसेच 'उदयोजक मेळावा' साजरा करण्याचा आगळावेगळा उपक्रम हाती घेतला आहे.

त्याकरिता यु.ई.एस. स्कूल ण्ड कॉलेजतर्फे आग्रहाचं आमंत्रण सर्व पालकांना देण्यात आलं होतं, ज्याला प्रतिसाद म्हणून पालकांनी प्रचंड प्रमाणात सरस्वती मंडप व त्याच्या बाहेरील परिसरात गर्दी केली होती. पेस्ट्री, बर्गर, पाणीपुरी, टीशर्ट, ड्रेसमटेरियल कॉस्मॅटिक ॲण्ड ज्वे–लरी, स्टेशनरी, फॅन्सी सॅन्डल्स, कोल्ड ड्रींक यांचे स्टॉल्स 'उद्योजक मेळाव्याच्या ' निमित्ताने सिनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी लावले होते. तर स्कूल व ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी फळे व भाज्यांचे स्टॉल्स लावले होते. पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. सरस्वती मंडप व त्याच्या बाहेरील परिसराला जणू काही एखादया मार्केटचेच् स्वरूप प्राप्त झाले होते. भाजी, फळे व विविध वस्तू विकण्याचा अनुभव घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. आपल्या पाल्यांकडून भाजी इत्यादी वस्तू विकत घेण्यासाठी आलेल्या पालकांच्याही चेहऱ्यावर आनंद दिसत होता. अश्या रितीने यु.ई.एस. स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये 'मार्केटिंग डे' व 'उद्योजक मेळावा' संपन्न झाला.




---

मे.न्यायाधिश के.जी.पालदेवार साहेब यांचे न्यायालयात

श्री.शिवाजी एम. पाटील
पनवेल, जि.रायगड

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश रायगड पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५९/२०२१
नि.नं.१४/ड
ने.ता.२१/०१/२०२३

श्रीमती.प्रियंका प्रभाकर नागांसुरे
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्र.५९/२०२१ नुसार अर्जदार यांस कु.संकेत प्रभाकर नागांसुरे, यांच्या हिश्श्याची अथवा त्याला मिळणाऱ्या हिश्श्याची मौजे : पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड येथील प्लॉट नं.२०१, सेक्टर नं.आर–३, क्षेत्र ४८० चौ.मी. पैकी १७.५० चौ.मी. ही मिळकत सरकारी बाजारभाव मुल्याप्रमाणे श्रीमती.भाग्यश्री पृथ्वीराज म्हात्रे यांना विक्री करणेकरिता किंवा हक्कसोडपत्र करणेकरिता, करारावर सही करण्याकरिता, सदरचे करार नोंदणीकृत करणेकरिता, सदर विक्रीतून मिळणारी मोबदल्याची रक्कम स्वीकारण्याकरिता अर्ज केलेला आहे.

सदर अर्जदार ह्यांचे पती कै.प्रभाकर बाबू नागांसुरे यांचे निधन दि.१०/०२/२०१७ रोजी मु.किल्लारी तांडा, ता.औसा, जि.लातूर येथे झाले आहे. अर्जदार श्रीमती.प्रियंका प्रभाकर नागांसुरे यांच्या व्यतिरिक्त कु.संकेत प्रभाकर नागांसुरे यांचे अज्ञान पालनकर्ती जनक माता म्हणून कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून तीस दिवसांच्या आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दि.२१/०१/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे. अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून मे.कोर्ट पुढील कारवाई करेल.

सदर नोटीस आज दि.१७/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक, जिल्हा व अति.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक, जिल्हा व अति.न्याया, पनवेल

---

ॲड.सतिश ब. आहेर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८६०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०२/२०२३

कै.दिनकर वासुदेव दिघे मयत तर्फे वारस
१) श्रीमती.मिनाक्षी दिनकर दिघे
वय : ८६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अनिल दिनकर दिघे
वय : ६२ वर्षे, धंदा : निवृत्त
३) श्री.अमित दिनकर दिघे
वय : ६० वर्षे, धंदा : निवृत्त
४) सौ.अनिता रिचर्ड पेरेरा@अनिता दिनकर दिघे
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व तमाम जनतेस कळविण्यात येते की, कै.दिनकर वासुदेव दिघे यांचे निधन दि.१५/१२/२०१९ रोजी कोथरुड, ता.हवेली, जि.पुणे येथे झाले.

**कै.दिनकर वासुदेव दिघे यांचे हक्कात असलेली जंगम मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–**

**इंडियन पोस्ट बँक शाखा, पनवेल पोस्ट ऑफिस येथील पेशंन्स सेविंग अकाऊंट नं.०६३३७२६४४५.**

मयत कै.दिनकर वासुदेव दिघे यांच्या पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील. कै.दिनकर वासुदेव दिघे यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१७/१२/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.इंद्रजित सिंह सोहता रा.खारघर यांनी सांगितल्याप्रमाणे खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत विकत देण्याबाबत पेपर नोटीस देण्यात येत आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | भूमापन नं. | उपविभाग नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शिरढोण | १८७ | ५ | ०–०२–१० | ०–४७ |

वर वर्णन केलेली शेतजमीन मिळकत श्री.इंद्रजित सिंह सोहता रा.खारघर यांना कायमस्वरुपी विक्री करण्यात येणार आहे. तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींना वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार त्यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी, रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

पनवेल
दि.१९/१२/२०२२

सही/–
**विनोद जी. ठाणगे**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**शॉप नं.१००, पहिला मजला, पनवेल म्युन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या मागे, पनवेल, जि.रायगड**

---

मा.सोनावणे सो

अर्जदारांचे वकील
कु.धनश्री मा. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८१२/२०२२
ने.ता.२३/०१/२०२३

१) श्रीमती.उषा भास्कर तिरपुडे
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.क्षितीज उर्फ शितीज भास्कर तिरपुडे
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
३) श्री.सागर उर्फ सगर भास्कर तिरपुडे
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.फ्लॅट नं.ए–४०१, एक्रम हेरिटेज, प्लॉट नं.२८,
सेक्टर–३५ ई, खारघर–४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.सुमन कुंडलिक तिरपुडे
वय : ८१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बाराभाटी, गोंदीया, बाराभाटी,
महाराष्ट्र–४४१७०२ — सामनेवाली

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी भास्कर कुंडलिक तिरपुडे हे दि.१४/०६/२०२१ रोजी मरण पावले असून त्यांच्या मृत्यूपश्चात पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सिडको लिमिटेड यांचे दफ्तरी त्यांचे नावे आहे :–

मौजे : खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सिडको लिमिटेड यांच्या हद्दीतील सेक्टर नं.३५ ई मधील प्लॉट नं.२८ या भूखंडावर बांधण्यात आलेल्या 'एक्रम हेरिटेज' या इमारतीमधील ए–विंग, चौथ्या मजल्यावरील सदनिका क्र.४०१, ज्याचे क्षेत्र ४४ चौ.मी. आणि शेअर सर्टीफिकेट प्रत्येकी रुपये ५०/– चे १२१ ते १३० क्रमांकाचे १० शेअर्स अशी मिळकत

आणि ज्याअर्थी सदर अर्जददार हे कै.भास्कर कुंडलिक तिरपुडे यांचे वारस असल्याने त्यांच्या मृत्यूपश्चात सदर मिळकत सिडको लिमिटेड यांच्या दफ्तरी सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता सदर अर्जदारांनी ते मयत भास्कर कुंडलिक तिरपुडे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१७ माहे १२ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मुजावर साहेब
अर्जदारातर्फे वकील ॲड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५६२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२२

कै.कन्हैयालाल शिवनाथराम सुथार उर्फ मेस्त्री
(मयत) यांचे कायदेशीर वारस
१) श्रीमती.कमलादेवी कन्हैयालाल सुथार
वय : , व्यवसाय :
रा.फ्लॅट नं.सी ३०९, परमेश्वर कृपा,
राहुल नगर केबिन रोड, भायंदर पूर्व, मुंबई
२) श्री.सुनील कन्हैयालाल सुथार
वय : , व्यवसाय :
रा.फ्लॅट नं.सी ३०९, परमेश्वर कृपा,
राहुल नगर केबिन रोड, भायंदर पूर्व, मुंबई
३) कुमारी.सानिका कन्हैयालाल सुथार
वय : , व्यवसाय :
रा.फ्लॅट नं.सी ३०९, परमेश्वर कृपा,
राहुल नगर केबिन रोड, भायंदर पूर्व, मुंबई — अर्जदार क्र.१ ते ३
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै. कन्हैयालाल शिवनाथराम सुथार उर्फ मेस्त्री (मयत) यांचे कायदेशीर वारस यांचे वारस अर्जदार क्र.१ व ३ ही त्यांची मुलगी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.कन्हैयालाल शिवनाथराम सुथार उर्फ मेस्त्री यांचा मृत्यू दि.२८/११/२०१० रोजी (मुंबई) येथे निधन झाले आहे.

**कै.कन्हैयालाल शिवनाथराम सुथार उर्फ मेस्त्री यांची मिळकत शॉप नं.६ तळमजला, अनिरुद्ध आर्केड को.ऑप.हौसिंग सोसायटी, एलटीडी कारपेट एरिया ३२३ स्क्वेअर फिट व बिल्टअप एरिया ३८७.६ स्क्वेअर फिट, प्लॉट नं.१०२, सेक्टर ३५, कामोठे ४१०२०९, ता.पनवेल, जि.रायगड, राज्य : महाराष्ट्र**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सवतः अगर वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५ माहे १२ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक, दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

अर्जदारातर्फे वकील
ॲड.स्वप्निल एस. ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८८७/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.२७/०१/२०२३

श्री.सुनील पहिलाजराय
उर्फ पहिलाज वाधवाणी, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : उल्हासनगर, जि.ठाणे व मौजे : कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे तसेच मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

१) उल्हासनगर नगरपरिषदेच्या हद्दीतील, खाता नं.१६२७/२११५ च्या वॉर्ड नं.४४, नवीन खाता नं.२११५ चा वॉर्ड नं.४४, येथील युनिट नं.९८, शीट नं.१३, शॉप नं.७७ व सपना कॉम्प्लेक्सच्या पाठीमागे, उल्हासनगर–४, जि.ठाणे.

२) मौजे : कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.१८७, या जागेवरील ''चामुंडा कॉम्लेक्स'' मधील आर.सी.सी. गोडावून नं.डी–९ सब प्लॉट नं.डी–९, क्षेत्र ३७२० चौ.फूट (३४५.७२ चौ.मी. बांधीव क्षेत्र व त्याखालील जमीन)

**३) मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ३ (अ) | नेरे | १ | ३ | ३–५८–०० | ३५.८० |
| ३ (ब) | नेरे | १ | ४ | ३–८४–०० | ३८.४० |

कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी हे दि.०५/०७/२०१६ रोजी, ठाणे येथे मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्र.१) श्री.सुनील पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, अर्जदार क्र.२) श्री.विनोद पहिलाराय उर्फ पहिलाज वाधवाणी, अर्जदार क्र.३) श्रीमती.राणी पहिलाराय उर्फ पहिलाज वाधवाणी, सबब अर्जदार हेच कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखला केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१७/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील चिखले येथून वेल्फ्रेड कॉलेज शेडुंग येथे स्कॉलरशिपचा फोर्म भरण्यासाठी जाते असे सांगून बाहेर पडली मात्र परत घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. सदर तरुणीचे नाव अंकिता वसंत भोईर (वय २२वर्षे) असून तिची उंची अंदाजे ५ फुट, रंग सावळा, डोक्याचे केस लांब, नेसुन– निळया रंगाची जिन्स पेन्ट व पोपटी रंगाचा टी शर्ट, ब्राउन कलरची बाटा कंपनीची चप्पल पायात आहे.

## रेल्वे प्रवासात चोरीस गेलेले मोबाईल प्रवाशांना मिळाले परत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात रेल्वे प्रवासात झालेल्या चोरीचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले असून प्रवाशांना त्यांचे मोबाइल परत देण्यात आले आहेत.

विचुंबे येथे राहणारे महेश बुदगे मुंबईला कामानिमित्त जात असताना त्यांचा साडे सोळा हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरट्यांनी पळवून नेला होता. याप्रकरणी रेल्वे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला होता. तसेच खांदा कॉलनीमध्ये राहणारा प्रशांत अरोलकर हा तरुण खारघर रेल्वे स्टेशनमध्ये लोकलमध्ये चढत असताना चोरट्यांनी त्याच्या खिशातील आठ हजार नऊशे रुपये किमतीचा मोबाइल चोरून होता.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# माशांच्या मृत्यूला जबाबदार कोण? ; शासकीय अधिकारी शोधात

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील खोपटा खाडी परिसरात गेली दोन दिवस मोठ्या प्रमाणात विविध जा–तींचे मासे मरण पावल्याची घटना घडली आहे. त्यामुळे दुषित झालेल्या खोपटा खाडीतील मासे खायला योग्य नाही अशी दवंडी गावा गावात पिटू लागल्याने खवय्यांनी खाडीतील मासे खाण्याकडे पाठ फिरवली आहे. परंतु खोपटा खाडी परिसरात वारंवार मरण पावणाऱ्या माशांच्या मुत्यूला जबाबदार कोण याचा शोध शासकीय अधिकारी घेत असल्याची माहिती उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.

उरण तालुक्यातील जसखार, भेंडखळ, नवघर, पागोटे, बांधपाडा, कोप्रोली, दिघोडे,वेश्वी, चिर्ले, विधणे, कळंबुसरे, मोठी जुई आणि धुतूम ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात मालाची हाताळणी करणाऱ्या कंटेनर यार्ड बरोबर आँइल ची साठवणूक करणाऱ्या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. परंतु शासकीय नियमांची पायमल्ली करणारे सदर कंटेनर यार्ड आणि आँइल प्रकल्पाचे व्यवस्थापक अधिकारी हे जाणून बुजून मुदत संपलेल्या मालाची, केमिकल मिश्रित द्रव्यांची विल्हेवाट ही योग्य ठिकाणी न लावता जनतेच्या आरोग्याशी, जीवाशी खेळून लावत असल्याचे चित्र सर्रास घडणाऱ्या खोपटा खाडीच्या घटनातून समोर येत आहे.

गुरुवारी ( दि१५) हजारो मासे खोपटा खाडी परिसरात मुत्यूमुखी पडल्याची घटना पुन्हा एकदा घडली आहे. त्यामुळे खाडी परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. परंतु हे मासे कशामुळे मरण पावले यांचा थांगपत्ता आजतागायत शासकीय यंत्रणेला न लागल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे. एकंदरीत जनतेच्या आरोग्याशी, जीवाशी धोका निर्माण करणारी माणसे शासकीय अधिकारी वर्गाला सापडत नसतील तर न्यायाची अपेक्षा कोणाकडे ठेवावी अशी प्रतिक्रीया गोरं गरीब खाडी किनाऱ्यावर मासेमारी करणारे बांधव शासनकर्त्यांना विचारत आहेत. त्यामुळे दुषित खाडीतील मासे खवय्यांनी खावू नये अशी दवंडी गावा गावात गावकरी पिटू लागल्याचे ऐकण्यास मिळत आहे.

खोपटा खाडी परिसरातील हजारो माशांच्या मुत्यूला जबाबदार कोण या संदर्भात उरणचे तह–सीलदार भाऊसाहेब अंधारे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की खोपटा खाडी परिसरात मरण पावणाऱ्या माशांच्या मुत्यू कशामुळे झाला याचा अहवाल घेत आहोत. तरी रहिवाशांनी, शेतकऱ्यांनी सहकार्य करावे. आणि काही माहिती असल्यास शासकीय यंत्रणेला खबरदारी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

# श्रीवर्धन तालुक्यातील पीक पाहणीद्वारे न करता तलाठ्यांद्वारेच करण्यात यावी

### बाळासाहेबांच्या शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

पिक पाहणीच्या नोंदी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने एक प तयार केला होता. यामध्ये शेतकऱ्यांनी स्वतःच पीक पाहणीची माहिती भरण्याची योजना तयार करण्यात आली होती. परंतु श्रीवर्धन तालुक्यात शेतकऱ्यांची जमिनीची भौगोलिक रचना पाहता एका शेतकऱ्याच्या नावे काही गुंठ्यांमध्येच जमीन असलेली पाहायला मिळते. एकरामध्ये किंवा हेक्टरी मध्ये चुकून एखाद दुसरा शेतकरी सापडून येऊ शकतो. कोकणातील जो शेतकरी भात शेती करतो त्याची परिस्थिती यथातथाच आहे. त्यामुळे पीक पाहणी साठी तयार केलेला प घेण्यासाठी सदर शेतकऱ्याकडे अँड्रॉइड मोबाईलची देखील वानवा आहे.

त्याचप्रमाणे कोकणातील डोंगरदर्यांचा परिसर असल्यामुळे नेटवर्कचा प्रॉब्लेम हा नित्याचाच आहे. त्यामुळे यावर्षी श्रीवर्धन तालुक्यातील भात शेती पिकवणाऱ्या जवळजवळ ९०% शेतकऱ्यांनी पीक पाहणीची नोंदणी केलीच नाही. यामुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणावरती नुकसान होणार आहे. कारण ज्या शेतकऱ्यांनी पीक पाहणीच्या नोंदणी केलेल्या नाहीत, त्यांचे भात शासकीय भात खरेदी केंद्रावर खरेदी केले जात नाही.

आजमितिला शासकीय भात खरेदी केंद्रावरती प्रतिक्विंटल २४०० रुपये भाव आहे. तर बाजारामध्ये हाच भाव १२०० रुपये सुद्धा मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. तरी श्रीवर्धन महसूल विभागाने पीक पाहणीच्या नोंदी तलाठ्यांकडुनच कराव्यात अशी मागणी बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे.त्यासाठी श्रीवर्धन येथील तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

# तळोजा वसाहतीत सिडकोकडून रस्त्याच्या कामाला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा वसाहतीत 'सिडको' कडून रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तळोजा वसाहत महापालिकेकडे हस्तांतरण झाल्यामुळे 'सिडको'कडून हे अखेरचे काम असून यापुढे रस्त्याचे काम महापालिकेकडून केले जाणार आहे. दरम्यान, रस्त्याच्या कामातून सिडको अधिकाऱ्यांची सुटका होणार आल्यामुळे अधिकारी–कर्मचारी समाधान व्यक्त करीत आहे.

तळोजा वसाहत मधील रस्त्याची धूळधाण झाली असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे. रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे नागरिक त्रस्त आ–हेत. तळोजा वसाहत मधील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहने बंद पडत असून रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे अन्यथा तळोजा वसाहतीत धावणारी एनएमएमटीच्या बसेस बंद करावे ला–गेल, असे पत्र नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या आडगांव आगार व्यवस्थापकाकडून पनवेल महापालिकेला देण्यात आले होते.

तळोजा मधील सामाजिक तसेच राजकीय व्यक्तींनी देखील सिडकोकडे पत्र व्यवहार करून येथील रस्त्याची अवस्था वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. यानंतर दहा महिन्यापूर्वी सिडकोकडून तळोजा फेज–१ मधील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी १२ कोटी तर फेज–२ मधील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी १६ कोटी असे जवळपास २८ कोटी रुपये खर्च करून रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला एप्रिल महिण्यात मंजुरी देवून एजन्सीची नेमणूक देखील केली होती. सदर एजन्सीकडून मे अखेरीस काही सेक्टर कामाला देखील सुरुवात झाली होती मात्र पावसाळ्यात खड्डे पडल्यास सिडकोकडून निकृष्ट दर्जाचे कामे करण्यात आली असा ठपका ठेवण्यात येईल. याकारणाने पावसाळा समाप्त होताच रस्त्याचे काम हाती घेण्यात आले असून सदरचे काम हे सिडकोतर्फे अखेरचे काम असून यानंतर ते महापालिकेचे स्वाधीन केले जाणार आहे.

### महेंद्र घरत यांच्या संघटनेची घोडदौड कायम

# शेरॉन बायोमेडिसिन मधील कामगारांना ८००० रुपये पगारवाढ

**दै.रायगड नगरी । उरण**



कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणारे कामगार नेते तथा रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वातील NMGKS संघटनेची घोडदौड सुरु आहे. रायगड, नवी मुंबईतील कामगारांसाठी आपले न्याय –हक्क मिळवून देणारी न्यू मेरिटाईम अँड जनरल कामगार संघटना ही एकमेव संघटना आहे.

या वर्षातील संघटनेमार्फत हा १५ वा पगारवाढीचा करार मे. शेरॉन बायोमेडिसिन प्रा. लि. तळोजा या कंपनीतील कामगारांसाठी करण्यात आला.

कंपनी लिक्विडेशन मुळे बँकेच्या ताब्यात असताना कंपनी सुरु राहणं व कामगारांची नोकरी टिकविणे महत्व–ाचे होते. अशावेळी संघटनेच्या यशस्वी माध्यस्थीमुळे कामगारांना तीन वर्षासाठी रुपये ८०००/–पगारवाढ करण्यात आली. त्याच बरोबर दिवाळी बोनस प्रत्येकी १८०००/–रुपये, तीन लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी देण्याचे कंपनीतर्फे मान्य करण्यात आले. पगारवाढिची थकबाकी (एरियर) ३१ डिसेंबर पूर्वी देण्याचेही मान्य करण्यात आले आहे.

या करारनाम्याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष, कामगार नेते महेंद्रजी घरत, कार्याध्यक्ष –पि. के. रमण, सरचिटणीस –वैभव पाटील, कंपनी उएज– कौशिक बॅनर्जी, असिस्टंट जनरल मॅनेजर –माया शर्मा,प्लॅन्ट मॅनेजर –संदीप ओझा, एच. आर. मॅनेजर –नितीन मेश्राम, कामगार प्रतिनिधी –महेंद्र ढोंगरे, रोहन कोळी, अनिल ढोंगरे, महेश पाटील, विद्यानंद पाटील, महेश लहू पाटील आदी उपस्थित होते.

# इनडोअर स्टेडियमवर क्षेत्रीय शालेय कुस्ती स्पर्धेला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टाटा स्टीलच्या खोपोली, सावरोली येथील प्लांटच्या जवळ असलेल्या टाटा स्टील हाऊसिंग कॉलोनीमध्ये मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२२ ला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेचे आयोजन टाटा स्टीलने महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण संचानालय, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद रायगड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अलिबाग आणि कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुल, खोपोली यांच्या सहयोगाने केले आहे. या स्पर्धेचे उदघाटन कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी कर्जत आणि खालापूर तालुक्यांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करवून दिला जाईल, अशी घोषणा करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, टाटा स्टील सीएसआर मॅनेजर भावेश रावल, खोपो–लीचे माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, खालापूर तालुका कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष अध्यक्ष संतोष जंगम, सुभाष घासे आदी उपस्थित होते.

रायगड, पालघर जिल्हे, ठाणे महानगरपालिका, ठाणे (ग्रामीण), पनवेल महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका, मुंबई शहर, मुंबई उपनगरे, मीरा भायंदर महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका आणि भिवंडी निजामपूर महानगरपालिका या ठिकाणांहून स्पर्धक या स्पर्धांमध्ये सहभागी झाले आहेत. ज्यांनी महानगरपालिकेमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धा जिंकल्या आहेत अशी १४, १७ आणि १९ वर्षे वयाची ३५० पेक्षा जास्त मुलेमुली या स्पर्धेत आपापली कौशल्ये आजमावत आहेत. यावेळी आमदार महेंद्र थोरवे म्हणाले कि, टाटा स्टीलने कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलाच्या सहयोगाने कुस्ती कोचिंग सेंटरला पाठिंबा देण्यासाठी जे प्रयत्न चालवले आहेत तसेच खालापूर तालुक्यामध्ये दर्जेदार कुस्तीवीर निर्माण व्हावेत यासाठी जे योगदान दिले आहे त्याबद्दल मी कौतुक करू इच्छितो. यावेळी टाटा स्टील खोपोलीचे कार्यकारी प्लांट प्रमुख कपिल मोदी यांनी सांगितले कि, टाटा स्टीलमध्ये आम्ही मानतो की खेळ हा जीवनशैलीचा एक भाग आहे आणि म्हणूनच मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२२ सोबत सहयोग करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. युवा कुस्तीवीरांना भविष्यात अजून मोठ्या स्तरावर जाऊन खेळता यावे यासाठी आपली कौशल्ये आजमावण्यासाठी आणि त्यांमध्ये आवश्यक विकास घडवून आणण्यासाठी हा उत्कृष्ट मंच आहे, सांगून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



# तालुका आरोग्य केंद्रात संतती नियमन सुविधा उपलब्ध करावी : राखी करंबे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दुर्गम व डोंगराळ भाग असलेल्या म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांत वाहतुकीची साधने पहाता आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधांची फारच अभाव असल्याने आरोग्य सेवेतील उपलब्धता तर दुरच त्यातच ग्रामीण भागतील शिक्षित प्रमाण खुप कमी असल्या कारणाने संतती नियमन बाबत म्हणावी तशी जनजागृती झालेली नाही.ती आता लोकसंख्येच्या वाढी नुसार नितांत गरजेची आहे.तालुका स्तरावर तालुका आरोग्य केंद्रात संतती नियमन सुविधा उपलब्ध करावी अशी अभ्यासु मागणी म्हसळा नगरपंचायतीच्या नगरसेविका राखी करंबे यांनी जिल्हा आरोग्य प्रशासनाला लेखी पत्र देऊन केली आहे.

म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयाचे तालुका वैद्यकीय अधिकारी यांना नगरसेविका राखी करंबे यांनी दिलेल्या मागणी निवेदनात या पुर्वी तालुका आरोग्य विभागामार्फत स्थानीक ठिकाणी सातत्याने संतती नियमन शिबीर आयोजित करण्यात येत होती परंतु सद्या तशा प्रकारची शिबीर आयोजित केली जात नाहीत. माहिती अंती शेवटचे शिबीर मार्च २०२२ मध्ये घेण्यात आले होते नंतर त्यात अनियमितता होत असल्याने ज्यांना संतती नियमन करण्याची इच्छा असते त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात जावे लागते.

परिणामी गाव खेड्यात या कामी अत्यल्प प्रतिसाद मिळतो आणि त्याचा परिणाम संतती नियमन करून घेण्यावर होत असल्याने नागरिकांना सोईचे ठिकाणी संतती नियमन सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणी नगरसेविका राखी करंबे यांनी तालुका वैद्यकिय अधिकारी प्रियंका देशमुख यांना लेखी निवेदन देऊन केली आहे. या वेळी त्यांचे समावेत शिवसेना पदाधिकारी अमित महामुनकर, अजय करंबे, शहर अध्यक्ष दीपल शिर्के, अभय कलमकर, राहुल जैन,कल्पेश जैन, अधीपरीचारिका रिना रणावडे, कविता गठडी उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनच्या अध्यक्षपदी निलेश पोटे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनच्या सन २०२५–२६ या रोटरी वर्षासाठी पनवेलमधील कुशल उद्योजक तथा पोटे मसाले कंपनीचे संचालक निलेश काशिनाथ पोटे यांची निवड झाली. त्यांनी माधुरी श्रीनिवास कोडूरु यांचा प्रचंड बहुमतांनी पराभव करुन रोमहर्षक विजय संपादन केला.

माजी अध्यक्ष गुरुदेवसिंग कोहली यांच्या नेतृत्वाखाली सागर हॉटेल, पनवेल येथे झालेल्या निवडणूक प्रक्रियेत उद्योजक निलेश पोटे यांनी हे उज्वल यश संपादन केले.

अध्यक्षपदी निलेश पोटे यांची निवड जाहीर होताच उपस्थितांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# अवैध वाहतुकीवर आठ दिवसात कारवाई करा

### अन्यथा २८ डिसेंबरला परिवहन कार्यालयात आंदोलनाचा नव भारतीय शिववाहतूक सेनेचा इशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल कळंबोली येथे लग्झरी बसमधून मोटार सायकल व इतर वस्तूंची बेकायदेशीर वाहतूक करताना भाजपा ट्रान्सपोर्टसेल प्रणित नवभारतीय शिव वाहतूक संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांनी पकडून दिली. राज्यभरात अश्याप्रकारे अवैध वाहतूक सुरु असून यावर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळे जर परिवहन कार्यालयाकडून आठ दिवसाच्या आत कडक कारवाई झाली नाही तर २८ डिसेंबर रोजी संघटनेचे प्रभारी आमदार आशिष शेलार, राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अराफत शेख यांच्या उपस्थितीत आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टी ट्रान्सपोर्ट सेल प्रणित नवभारतीय शिव वाहतूक संघटनेचे महाराष्ट्र सरचिटणीस निलेश निम्हण व त्यांचे साथीदारांनी महाराष्ट्र राज्य परिवहन सहकारी उपायुक्त अभय देशपांडे यांची भेट घेऊन राज्यभरात चालणाऱ्या अवैध वाहतूक कारवाईची मागणी केली होती. त्यावर अभय देशपांडे यांनी सकारात्मक दर्शवत कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. त्यानंतर पनवेल कळंबोली येथे मोटार सायकल व इतर माल यांची बेकायदेशीर वाहतूक करताना राजवीर ट्रॅव्हल्स च्या बसला रंगेहाथ पकडण्यात आले. मात्र परिवहन विभागाकडून कर्मचारी उपलब्ध नसल्याकारणाने बस वर कडक कारवाई न करता सोडून देण्यात आली. त्यानंतर पुन्हा खोपोली येथे ५० सीटर बस शाळेतील विद्यार्थी घेऊन उलटली त्याची देखील माहिती दिली. तरीसुद्धा परिवहन कार्यालयातून आम्हाला योग्य उत्तर मिळाले नाही.

त्यामुळे परिवहन कार्यालयाचे व अनधिकृत वाहतूक करणाऱ्यांचे काही साटेलोटे आहे का असा प्रश्न विचारात परिवहन कार्यालयाकडून आठ दिवसाच्या आत कडक कारवाई झाली नाही तर २८ डिसेंबर रोजी संघटनेचे प्रभारी आमदार आशिष शेलार, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अराफत शेख यांच्या उपस्थितीत पनवेल परिवहन कार्यालयात आंदोलन करण्यात येईल असा इशारा नवभारतीय शिव वाहतूक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संकेत पाटील यांनी दिला आहे.